तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १९ मार्च २०२५

आतील पानावर

पान २– ‘किंग’मध्ये दीपिका की करीना?
पान ३– ... म्हणून मी चित्रपट बनवणे बंद केले
पान ४ – मौसमी चॅटर्जी करणार बारा वर्षांनी कमबॅक
पान ५ – ‘फौजी’मध्ये या अभिनेत्याची एन्ट्री!
पान ६ – ‘पी.एस.आय. अर्जुन’मध्ये अंकुश चौधरी

# साऊथ सिनेमातील सोनाक्षीचा फर्स्ट लूक समोर








दबंग गर्ल सोनाक्षी सिन्हा तेलुगु सिनेमातून साऊथ सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे. जटाधारा सिनेमात सोनाक्षी दिसणार आहे. नुकताच महिला दिनाच्या निमित्ताने सोनाक्षीच्या या साऊथ सिनेमातील पहिला लूक समोर आला आहे. 'जटाधारा' सिनेमाचं पहिलं पोस्टर शेअर करण्यात आले आहे. 'जटाधारा' सिनेमाच्या या पोस्टरवर सोनाक्षीचा रुद्रावतार पाहायला मिळत आहे. या पोस्टरमध्ये सोनाक्षीचा कधीही न पाहिलेला लूक बघायला मिळत आहे. केस मोकळे सोडून डोक्यावर बिंदी लावली आहे. हातात, डोक्यावर आणि गळ्यात राणीसारखे आभूषण घातल्याचं दिसत आहे. तर हाताची लांबलचक नखं पाहायला मिळत आहेत. या लूकमध्ये सोनाक्षीच्या डोळ्यांत आग दिसत आहेत. शक्ती आणि सामर्थ्याची ताकद असं कॅप्शन देण्यात आलं आहे. जटाधारामधील सोनाक्षीचा हा लूक तिची दखल घेण्यास भाग पाडत आहे. सोनाक्षीचा 'जटाधारा' सिनेमातील हा लूक पाहून चाहतेही थक्क झाले आहेत. तिच्या या सिनेमाच्या शूटिंगला १४ फेब्रवारीपासून सुरुवात झाली आहे. झी स्टुडिओजची निर्मिती असलेल्या या सिनेमात सोनाक्षीसह शिल्पा शिरोडकर, रेन अंजली, दिव्या वीज अशी स्टारकास्ट आहे. तर वेंकट कल्याण सिनेमाचं दिग्दर्शन करत आहेत.

# 'किंग'मध्ये दीपिका की करीना?



बॉलीवूडचा किंग खान अर्थात शाहरुख खानच्या आगामी 'किंग' या चित्रपटाची चर्चा जोरात सुरू आहे. चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. डंकीनंतर शाहरुखचा एकही चित्रपट रिलीज करण्यात आलेला नाही. दरम्यान, त्याच्या 'किंग' या चित्रपटाशी निगडित चित्रपटातील कोणती अभिनेत्री किंग खानबरोबर स्क्रीन शेअर करणार याविषयी माहिती मिळत आहे. अभिनेत्री दीपिका पदुकोण किंवा करीना कपूर या दोघींपैकी एक अभिनेत्री या चित्रपटात दिसू शकते. असे वृत्त देण्यात आले आहे. मात्र, अद्यापपर्यंत याविषयी दुजोरा मिळालेला नाही. दीपिका आणि करीना या दोघींनीही याआधी शाहरुखसोबत काम केले आहे. दीपिकाने २००७ मध्ये 'ओम शांती ओम'मधून हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला होता. यानंतर दोघेही 'चेन्नई एक्सप्रेस', 'हॅपी न्यू इयर', 'पठाण' आणि 'जवान' यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र दिसले होते. त्याचबरोबर करिनाने शाहरुखसोबत 'कभी खुशी कभी गम', अशोका, 'डॉन' आणि 'रा.वन' सारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांच्या जोडीला प्रेक्षकांची पसंती मिळाली. 'किंग'मध्ये शाहरुखसोबत त्याची मुलगी सुहानाही मुख्य भूमिकेत दिसणार आहे. अभिनेता अभय वर्माही या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. नुकतेच लोकार्नो फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'किंग'बद्दल बोलताना शाहरुखने तो या चित्रपटात काम करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याचवेळी अबुधाबीमध्ये एका कार्यक्रमादरम्यान शाहरुखने या आणखी अपडेट्स दिले होते. तो म्हणाला, मी काही महिने शूटिंग करणार आहे. माझा दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद कडक आहे. त्याने 'पठाण'ही बनवला होता. त्याने मला काहीही सांगण्यास नकार दिला आहे. मी जास्त काही सांगू शकत नाही, पण मी वचन देतो की, चित्रपट पाहिल्यानंतर तुम्हाला खूप आनंद मिळेल.



# मीच ब्रेकअप केलं

नव्वदच्या दशकातील काही मॉडेलपैकी एक मॉडेल म्हणजे डिनो मोरिया. त्याने मॉडेलिंगबरोबरच चित्रपटांमध्येही आपलं नशीब आजमावण्याचा निर्णय घेतला. डिनोच्या करिअरपेक्षा त्याचं लव्ह लाईफ चांगलंच चर्चेत राहिलं. यात बॉलीवूड अभिनेत्री बिपाशा बासूचं नावदेखील घेतलं जातं. १९९६ पासून डिनो आणि बिपाशा एकमेकांना डेट करत होते. पण २००२ मध्ये हे दोघे काही कारणाने वेगळे झाले. मात्र या दोघांच्या ब्रेकअपचं नेमकं कारण काय होतं? याबद्दल नुकतंच डिनोने भाष्य केलं आहे. एका मुलाखतीत डिनोने बिपाशाबरोबरच्या ब्रेकअपबद्दल सांगितले आणि कबूल केले की, त्याने स्वत:च तिच्यापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला होता. बिपाशाला तेव्हा परिस्थितीचा सामना करणं खूप कठीण जात होतं आणि ब्रेकअपनंतर लगेचच 'राज' चित्रपटाचे चित्रीकरण करणेही तिच्यासाठी सोपे नव्हते. याबद्दल डिनोने भाष्य केलं आहे. तसंच त्याने सध्याच्या नात्याबद्दलही भाष्य केलं. यावेळी डिनोने असं म्हटलं की, 'राज'च्या काळात आम्ही वेगळे झालो होतो. खरे सांगायचे तर, आमच्यातील काही समस्यांमुळे मीच बिपाशापासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला. तिला खूप त्रास होत होता. यामुळेच तिला रोज भेटणं हे माझ्यासाठी खूप कठीण होतं. आम्ही आमचं नातं सुधारण्याचा प्रयत्नही केला, पण ते शक्य होत नव्हते. यामुळे, आम्ही पुढे जाण्याचा निर्णय घेतला. याच मुलाखतीत डिनोला त्याच्या सध्याच्या नात्याबद्दल विचारण्यात आले तेव्हा तो म्हणाला, 'प्रेम करणं चांगलं असतं. तुम्ही जितके जास्त प्रेम वाटाल, तितके जास्त प्रेम तुम्हाला मिळेल. कारण प्रत्येकाला असं वाटतं की, कुणीतरी आपल्यावर प्रेम करावं. मात्र यावेळी डिनोने त्याच्या प्रियसीबद्दलचा काहीच खुलासा केला नाही. त्यामुळे आता त्याची नवीन साथीदार कोण आहे? हे गुलदस्त्यात आहे. दरम्यान, डिनोच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, गेल्या काही काळापासून तो दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये दिसत आहे. बॉलीवूडमध्ये, तो शेवटचा २०१५ मध्ये आलेल्या 'अलोन' चित्रपटात दिसला होता. त्यानंतर आता तो लवकरच 'हाऊसफुल ५' मध्ये दिसणार असल्याचे म्हटलं जात आहे.

# श्रीदेवीची मुलगी तिच्या शेवटच्या सिनेमाच्या सिक्वेलमध्ये दिसणार



बॉलिवूड अभिनेत्री 'श्रीदेवी' आता या जगात नाही पण त्या त्यांच्या चित्रपटांद्वारे चाहत्यांच्या हृदयात आज देखील जिवंत आहे. श्रीदेवी शेवटची २०१७ मध्ये आलेल्या 'मॉम' चित्रपटात दिसली होती. श्रीदेवीनंतर आता तिच्या दोन्ही मुली जान्हवी आणि खुशी यांनी बॉलिवूडमध्ये प्रवेश केला आहे. अलिकडेच, चित्रपट निर्माते आणि श्रीदेवी यांचे पती बोना कपूर यांनी खुलासा केला आहे की ते 'मॉम २' बनवण्याची तयारी करत आहेत. यावेळी त्यांनी सांगितले होत की, या सिनेमात तिच्या एका मुलीला घेण्याचा विचार करत आहेत जी तिच्या आईच्या पावलावर पाऊल ठेवत आहे. आयफा २०२५ च्या ग्रीन कार्पेटवर माध्यमांशी बोलताना बोनी कपूर यांनी त्यांच्या मुली खुशी आणि जान्हवी यांचे कौतुक केले आणि सांगितले की त्यांना आशा आहे की त्यांच्या दोन्ही मुली त्यांच्या आईप्रमाणे यशस्वी होतील. बोनी कपूर यांनी खुलासा केला की ते त्यांची धाकटी मुलगी खुशी कपूरला 'मॉम २' मध्ये कास्ट करण्याची योजना आखत आहेत. 'मी खुशीचे सर्व चित्रपट पाहिले आहेत. आर्चीज, लव्हयापा आणि नादानियान. 'नो एंट्री' नंतर, मी तिच्यासोबत एक चित्रपट बनवण्याची योजना आखत आहे. हा आनंद देणारा चित्रपट असेल. ही मॉम २ असू शकते. ती तिच्या आईच्या पावलावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. आई ज्या- ज्या भाषांमध्ये काम करत होती. त्या सर्व भाषांमध्ये ती एक अव्वल स्टार होती. मला आशा आहे की खुशी आणि जान्हवी देखील या पातळीवर पोहोचू शकतील.

खुशी कपूरने २०२३ मध्ये नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'द आर्चीज' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. त्याच वर्षी तिचा 'लवयापा' हा चित्रपट प्रदर्शित झाला ज्यामध्ये आमिर खानचा मुलगा जुनैद खान तिच्यासोबत दिसला होता. आता अलिकडेच खुशी कपूर 'नादानियां' चित्रपटात दिसली. या चित्रपटात सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान त्याच्यासोबत दिसत आहे. या चित्रपटाद्वारे इब्राहिमने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे.

# ... म्हणून मी चित्रपट बनवणे बंद केले



'सौदागर', 'हीरो', 'खलनायक', 'परदेस', 'ताल', 'कर्मा', 'यादें' अशा गाजलेल्या चित्रपटांचे दिग्दर्शक सुभाष घई यांनी ८० व ९० च्या दशकात गाजलेल्या अनेक सिनेमांचेही दिग्दर्शन केले होते. विनोद खन्ना, जॅकी श्रॉफ, अनिल कपूर, सलमान खान, शाहरुख खान ते अक्षय खन्ना हे कलाकार त्यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांत दिसले होते. आता मात्र चित्रपटसृष्टीत झालेल्या बदलांमुळे सध्या चित्र बदलले आहे. तसेच अनेकजण याकडे कलात्मक दृष्टीने बघत नसून, पैसा कमावण्याचे किंवा फक्त काम करण्याचे माध्यम म्हणून बघत असल्याचे म्हणत त्यांनी नाराजी व्यक्त केली. सुभाष घई यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी म्हटले, मी चित्रपट बनवणे बंद केले आहे. कारण- मला लोकांमध्ये सिनेमाप्रति प्रेम दिसत नाही. अगदी माझ्या टीममध्येसुद्धा नाही. ते फक्त काम करीत आहेत. त्यांनी एका लेखकाचा एक किस्सा सांगितला.

त्यांनी म्हटले, मी एका लेखकाला एक कल्पना सांगितली आणि त्यावरून एक कथा लिहिण्यास सांगितले. त्यावर त्याने मला म्हटले की, तो १५ दिवसांत त्याचे काम पूर्ण करील. पहिल्या तीन दिवसांत पहिला ड्राफ्ट देईल. त्याबरोबरच त्याने पूर्ण फीदेखील मागितली. त्याने मला अचूक तारखाही दिल्या आणि सांगितले की, अमुक या तारखेला कथा पूर्ण लिहिलेली असेल. मी त्याला विचारले की, इतक्या पटकन कथा पूर्ण लिहून द्यायला तू चपाती बनवत आहेस का? मी अशा एखाद्या व्यक्तीबरोबर कसा काम करू शकतो? इंडस्ट्रीने स्वत:च त्याला अशा प्रकारे विचार करण्यास शिकवले आहे. सध्या ज्या पद्धतीने चित्रपट निर्मिती होते, त्यावर टीका करीत सुभाष घई यांनी म्हटले, लोक सध्या व्हॉट्सअपवर स्क्रिप्ट आणि डायलॉग लिहीत आहेत. खरी सर्जनशीलता कमी होत आहे. काही लोक सांगतात की, स्क्रिप्ट मेलवर पाठवून द्या. तेवढे पुरेसे आहे, असे म्हणत सुभाष घई यांनी चित्रपट बनवण्यातील, त्यात काम करण्यातील लोकांची आत्मीयता कमी झाल्याचे म्हटले आहे.

याच मुलाखतीत त्यांनी, आताचे कलाकार स्वत:ला ब्रँड समजत आहेत आणि अभिनयापेक्षा पैशाला प्राधान्य देत आहेत. गेल्या दशकात इंडस्ट्रीला एखादा सुपरस्टार बनविण्यात अपयश आले आहे. म्हणूनच ८० च्या दशकातले कलाकार आजही सुपरस्टार आहेत. सलमान खान, शाहरुख खान, आमिर खान, अक्षय कुमार हे आणि इतर काही आजही सुपरस्टार आहेत. कारण- ते त्या संस्कृतीतून आले आहेत. गेल्या १० वर्षांत रणबीर कपूरशिवाय कोण कोण स्टार बनले? कोणीही नाही, असे म्हटले.

# मौसमी चॅटर्जी करणार बारा वर्षांनी कमबॅक

चित्रपटसृष्टीत असे अनेक कलाकार आहेत, ज्यांनी लोकप्रिय सिनेमांमध्ये काम करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मात्र, काहीजण वयामुळे, तर काहीजण चित्रपटांना हवे तसे यश न मिळाल्यामुळेही मोठ्या पडद्यापासून दूर गेले. परंतु, मागील काही वर्षात शर्मिला टागोर, सेलिना जेटली, फरदीन खान सारख्या कलाकारांनी पुन्हा या क्षेत्रात पुनरागमन केले आहे. आता या यादीमध्ये मौसमी चॅटर्जींचे नाव देखील जोडले जाणार आहे. अभिनेत्री मौसमी चॅटर्जी तब्बल १२ वर्षांनी मोठ्या पडद्यावर कमबॅक करणार आहे. मौसमी यांनी शेवटचे २०१३ साली आलेल्या 'गोयनाप बक्शो' या सिनेमात काम केले होते. त्यांना हिंदीसह बंगाली चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी ओळखले जाते. आता मोठ्या पडद्यावर त्यांचे पुन्हा कमबॅक होणार असल्याने चाहते देखील त्यांना नवीन भूमिकेत पाहण्यासाठी उत्सुक आहेत. मौसमी चॅटर्जी या लवकरच 'आरी' या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात टीएमसीच्या माजी खासदार व अभिनेत्री नुसरत जहाँ या देखील आहेत. याशिवाय, नुसरत यांचे पती यश दासगुप्तांची देखील चित्रपटात प्रमुख भूमिका असणार आहे. ७६वर्षीय मौसमी यांनी आतापर्यंत १०० पेक्षा अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. ७०-८० च्या दशकात त्यांनी केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी अमिताभ बच्चन यांच्यासोबतही चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली आहे. त्यांनी १९६७ साली आलेला बंगाली चित्रपट 'बालिका बधू'च्या माध्यमातून करिअरला सुरुवात केली होती. याशिवाय, मौसमी यांनी 'रोटी कपड़ा और मकान', 'बेनाम' आणि 'मंजिल' या लोकप्रिय चित्रपटांमध्येही काम केले आहे. दरम्यान, नुसरत जहाँ आणि मौसमी चॅटर्जी यांची प्रमुख भूमिका असलेला 'आरी' हा चित्रपट २५ एप्रिलला मोठ्या पडद्यावर रिलीज होणार आहे. या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाले आहे.



इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती आणि त्यांच्या पत्नी सुधा मूर्ती यांची जोडी सध्या चांगलीच चर्चेत आहे. नारायण मूर्ती हे आयटी क्षेत्रातील कामासाठी ओळखले जातात, तर त्यांच्या पत्नी सुधा मूर्ती सामाजिक कार्यासोबतच पुस्तके लिहिण्यासाठी ओळखल्या जातात. आता या जोडीचे आयुष्य रुपेरी पडद्यावर पाहता येणार आहे. या चित्रपटावर लेखक-दिग्दर्शक-निर्माता अश्विनी अय्यर-तिवारी आणि नितेश तिवारी काम करत आहेत. हा चित्रपट हिंदी, तमिळ आणि नारायण मूर्ती यांच्या मातृभाषेत म्हणजेच कन्नडमध्ये बनवला जाणार आहे. या बायोपिकबद्दल नारायण मूर्ती खूप उत्साही असून त्यांनी चित्रपट निर्मात्यांना लवकरात लवकर या चित्रपटावर काम करण्यास सांगितले आहे. दरम्यान, या चित्रपटाचे नाव अद्याप फायनल झाले नसून सध्या 'मूर्ती' या नावाखाली हा प्रकल्प केला जात आहे. हा चित्रपट बनविण्यासाठी अश्विनी अय्यर- तिवारी आणि नितेश तिवारी आयडॉल कुटुंबातील प्रत्येक लहान आणि मोठी माहिती गोळा करण्यात गुंतले आहेत. जेणेकरून चित्रपटाची कहाणी त्यांच्या आधारावर उत्तमरित्या बनू शकेल. या चित्रपटाबाबत अश्विनी यांनी एका मुलाखतीत सांगितले की, चित्रपटाची स्क्रिप्ट अजून लिहिली जात आहे. यासाठी वेळ नक्कीच लागतो, पण त्यांची गोष्ट लोकांपर्यंत पोहोचवताना मला आनंद होत आहे. मला असा चित्रपट बनवायचा आहे ज्यामध्ये प्रेक्षक चित्रपटाशी एकरुप होऊ शकतील. केवळ कमर्शिअल हिट चित्रपट बनवणे हा उद्देश नसल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या चित्रपटासाठी अनेकजण उत्सुक आहेत.

# नारायण आणि सुधा मूर्तींवर येणार बायोपिक



# रणबीर कपूर आणि आमिर खान दिसणार एकत्र



बॉलीवूडमधील आलिया भट्ट आणि रणबीर कपूरची जोडी सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असतात. नुकतेच आलिया भट्टने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून एक व्हिडीओ शेअर केला आहे. आलिया भट्टने या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये रणबीर कपूर आणि आमिर खान कोणत्या प्रोजेक्टमध्ये एकत्र दिसणार असल्याचा खुलासा केला आहे. आलिया भट्टने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये आलियाच्या हातात एक पोस्टर असल्याचे पाहायला मिळत आहे. या पोस्टरवर या वर्षातील सर्वांत मोठं शत्रुत्व, असे म्हटले आहे. यावेळी आलिया भट्ट म्हणते की, मला तुम्हाला काहीतरी दाखवायचं आहे. माझे सर्वांत आवडते अभिनेते लवकरच एकत्र, एकमेकांच्या विरुद्ध दिसणार आहेत सर्वोत्तम कलाकारांची लढाई. त्यानंतर ती तिच्याजवळ असलेले पोस्टर दाखवते. त्यामध्ये आमिर खान आणि रणबीर कपूर दिसत आहेत. हे दोन लोकप्रिय अभिनेते एका जाहिरातीत एकत्र काम काम करणार असल्याचे आलियाने म्हटले आहे. विशेष म्हणजे रणबीर कपूरचा 'रामायण' या चित्रपटाचा दिग्दर्शक नितीश तिवारी या नवीन प्रोजेक्टचे देखील दिग्दर्शन करणार आहे. रणबीर कपूर आणि आमिर खानने याआधी 'पीके' या चित्रपटात एकत्र काम केले आहे. यात रणबीर कपूरने पाहुण्या कलाकाराची भूमिका साकारली होती. या चित्रपटात आमिर खानसह अनुष्का शर्मा प्रमुख भूमिकेत दिसली होती. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळाले. रणबीर कपूर आणि आलिया भट्ट लवकरच संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटात दिसणार आहेत. त्यामध्ये विकी कौशलही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. तर आमिर खानच्या लवकरच 'सितारे जमीन पर' या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. त्याच्या या चित्रपटाची चाहते देखील आतुरतेने वाट पाहत आहेत.

अभिनेत्री समांथा रुथ प्रभू ही एक लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिच्या जीवनात अनेक चढउतार आलेत, पण ती सर्व संकटांवर मात करत पुढे गेली. अभिनेता नागा चैतन्यपासून घटस्फोट, नंतर 'मायोसिटिस आजाराचा तिनं मोठ्या हिंमतीन सामना केला. समंथा रुथ प्रभू आणि नागा चैतन्य यांना वेगळं होऊन बराच काळ लोटला आहे. दोघेही आपापल्या आयुष्यात पुढे गेले आहेत.

तिचा लग्नाचा गाऊन फाडून त्याला एक नवीन रूप दिलं आहे. नागा चैतन्यसोबतच्या तिच्या ख्रिश्चन लग्नाच्या वेळी परिधान केलेला सुंदर पांढरा गाऊनचं तिनं काळ्या कॉर्सेटमध्ये रूपांतर केले आहे. अनेकांनी त्या ड्रेसला रिव्हेंज ड्रेसही म्हटलं. वेडिंग ड्रेसनंतर तिच्या बरगड्यांवरचा 'उहरू' असा टॅटू तिनं हटविला होता. नाग चैतन्यला अनेकजण 'चै' या नावाने ओळखतात. हे त्याचं टोपणनाव आहे.

नाही. पण, नेटकर्यांनी आंगठी आणि पेंडंटमधील साम्य शोधून काढलंय. ज्वेलरी इन्फ्लुएन्सर ध्रुमित मेरुलियाने समंथाच्या साखरपुड्याच्या अंगठीबाबत हा दावा केला आहे.



# समांथाने नागा चैतन्यची आणखी एक आठवण मिटवली

नुकतंच समांथाचा एक्स पती नागा चैतन्यनं अभिनेत्री शोभिता धुलिपाला हिच्यासोबत लग्न करत नवा संसार थाटला आहे. समांथा सध्या एकटीच आहे. ती नागा चैतन्यसोबत जोडलेल्या आठवणी मिटवण्याचा प्रयत्न करतेय. समांथानं काही दिवसांपुर्वी समांथाने वेडिंग ड्रेस आणि 'टॅटू'नंतर समांथाने नागा चैतन्यशी जोडणारी आणखी एक आठवण मिटवली आहे. समांथाच्या गळ्यातील चेनमध्ये अगदी तसंच पेंडंट पहायला मिळतंय. साखरपुड्याच्या अंगठीपासून पेंडंट बनवल्याचं तिने सोशल मीडियावर सांगितलेलं



# 'फौजी'मध्ये या अभिनेत्याची एन्ट्री!

साऊथ सुपरस्टार प्रभास सध्या त्याच्या अनेक चित्रपटांच्या निर्मितीमध्ये व्यस्त आहे, त्यापैकी एक 'फौजी' आहे. हा युद्ध नाट्यमय चित्रपट हनु राघवपुडी यांनी दिग्दर्शित केला आहे. निर्माते वेळोवेळी या चित्रपटाशी संबंधित माहिती चाहत्यांसोबत शेअर करत असतात. प्रभास या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, आता या चित्रपटाबद्दल एक मनोरंजक बातमी समोर येत आहे, जी त्याच्या कलाकारांशी संबंधित आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण सध्या हैदराबादमधील आरएफसी येथे सुरू आहे आणि बातमी अशी आहे की प्रभाससोबत बॉलिवूड कलाकार देखील या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत.

अभिनेता अनुपम खेर यात प्रभाससोबत दिसू शकतात. जर हे वृत्त खरे असेल, तर कार्तिकेय २ आणि टायगर नागेश्वर राव नंतर हा त्याचा तिसरा तेलुगू चित्रपट असेल. परंतु, फौजी टीमकडून अधिकृत पुष्टीची वाट पाहिली जात आहे. फौजी हा एक ॲक्शन ड्रामा चित्रपट आहे, ज्यामध्ये प्रभास एका लष्करी अधिकार्याची भूमिका साकारताना दिसणार आहे. या चित्रपटाची निर्मिती यूव्ही क्रिएशन्स करत आहे. यासोबतच प्रभास अनेक चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. प्रभास मारुती दसारी दिग्दर्शित 'द राजा साब' या हॉरर कॉमेडी चित्रपटाचेही चित्रीकरण करत आहे, जो मोठ्या प्रमाणात बनवला जात आहे. इतक्या चित्रपटांच्या तयारीत असताना, प्रभास कोणत्याही ब्रेकशिवाय सतत काम करत आहे. 'फौजी' हा चित्रपट मैत्री मूव्ही मेकर्स निर्मित करत आहे. या चित्रपटात प्रभाससोबत अभिनेत्री इमावी मुख्य भूमिकेत आहे. या मोठ्या बजेटच्या चित्रपटाचे संगीत विशन चंद्रशेखर यांनी दिले आहे, तर संकलन कोटागिरी वेंकटेश्वर राव यांनी केले आहे आणि छायाचित्रण सुदीप चॅटर्जी यांनी केले आहे.



# नयनतारा भूमिकेसाठी करतेय महिन्यापासून उपवास

प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्री नयनताराला 'लेडी सुपरस्टार' म्हणून ओळखले जाते. नयनताराच्या अनेक चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केली आहे. अभिनेत्री चित्रपटातील तिच्या भूमिकेसाठी संपूर्ण समर्पण देताना पाहायला मिळते. आता ती लवकरच 'मुकुथी अम्मन २' चित्रपटात झळकणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटासाठी नयनतारा मागील एक महिन्यापासून उपवास करत आहे. वर्ष २०20 मध्ये नयनताराची प्रमुख भूमिका असलेला 'मुकुथी अम्मन' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटातील तिची भूमिका प्रेक्षकांना खूपच भावली होती. आता या सिनेमाचा सिक्वल मोठ्या पडद्यावर येत आहे. नुकतेच चित्रपटाची मुहूर्त पूजा पार पडली. यावेळी नयनतारा देखील उपस्थित होते. चित्रपटाच्या मुहूर्त पुजावेळी बोलताना नयनताराने तिच्या भूमिकेबद्दल सांगितले. 'ही भूमिका साकारणे फक्त अभिनयापुरते मर्यादित नाही, तर ही एक भावना आहे.', असे ती म्हणाली. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक सी दिग्दर्शक यांनी नयनतारा मागील १ महिन्यापासून उपवास करत असल्याचे सांगितले. देवी मुकुथी अम्मन यांच्या प्रती असलेल्या श्रद्धेसाठी नयनातारा उपवास करत आहे. मुकुथी अम्मनच्या पहिल्या भागाच्यावेळीही तिने उपवास केला होता. दरम्यान, 'मुकुथी अम्मन २' च्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. हा चित्रपट यावर्षीच्या अखेरपर्यंत मोठ्या पडद्यावर रिलीज होण्याची शक्यता आहे. चित्रपटात नयनतारासोबतच खुशबू, मीणा, रवी, मोहन आणि विजय हे कलाकार देखील आहे. 'मुकुथी अम्मन' हा चित्रपट २०20 मध्ये रिलीज झाला होता. आता ५ वर्षांनी याचा सिक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

# ‘फॉलोअर’ सिनेमाचा ट्रेलर रिलीज




महाराष्ट्राच्या सीमाभागात मराठी, कन्नड भाषेचा वाद हा गेली अनेक वर्षांपासून आहे. याच सीमाभागातील मराठी, कन्नड भाषावादाची पार्श्वभूमी आणि तीन मित्रांची रंजक कथा असलेल्या फॉलोअर या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच सोशल मीडियावर लॉंच करण्यात आला आहे. नव्या दमाच्या कलाकारांचा समावेश असलेल्या या चित्रपटाचा ट्रेलर अतिशय उत्तम आणि गुंतवणारा आहे.

सीमावादाने ग्रस्त असलेल्या बेलगाव शहरात घडणार्या या कथेत, एका कट्टर विचारसरणीच्या पत्रकाराला आपल्या समाजावरील अत्याचार उघड करण्यावर विश्वास आहे. पण त्याचा हा विश्वास शहरातील एका कट्टर नेत्यांनी पसरवलेल्या अपूर्ण आणि एकतर्फी सत्यावर आधारलेला आहे. त्याशिवाय चित्रपटाला प्रेमकहाणी, वडील-मुलगा यांच्यातील संघर्ष असेही पदर असल्याचं जाणवतं. मराठी, कन्नड, हिंदी या भाषांमध्ये हा चित्रपट आहे. आगळावेगळा विषय, संयत पद्धतीनं केलेली मांडणी, नव्या दमाचे कलाकार हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे 'फॉलोअर'ला चित्रपटगृहात मोठ्या पडद्यावर पाहावा लागणार आहे.

येत्या २१ मार्चला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होत आहे. 'फॉलोअर'ची निर्मिती ऑरेंजपिक्सेल स्टुडिओज आणि व्हिस्का फिल्म्स यांनी हमारा मीडिया लॅब्स आणि कॉजॅलिटी फिल्म्स प्रोडक्शन यांच्या सहकार्याने केली आहे. विनय मिश्रा, प्रीती अली, प्रतीक मोइत्रो, अनुभव केआर, पल्लवी रोहतगी, मौलिक शर्मा, चारुलता मैत्र, हर्षद नलावडे हे या चित्रपटाचे निर्माते असून राघवन भारद्वाज, चरण सुवर्णा आणि अभिषेक गौतम हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत.

चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन हर्षद नलावडे यांचे असून निभावली असून रघु बसरीमारद, डोना मुन्शी आणि हर्षद नलावडे यांच्यासह प्रतिभावान कलाकारांचा समावेश आहे. साकेत ग्यानी यांनी छायाचित्रण, मौलिक शर्मा संकलक, सम्यक सिंग यांनी लिहिलेल्या गीतांना सम्यक सिंग आणि अभिज्ञान अरोरा यांचे संगीत लाभले असून ही गाणी सम्यक सिंग यांच्या आवाजात रेकॉर्ड करण्यात आली आहेत.

## सचिन खेडेकरांचे २१ वर्षांनी रंगभूमीवर कमबॅक



अभिनेते सचिन खेडेकर यांनी मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. यानंतर आता ते तब्बल २१ वर्षांनी पुन्हा मराठी व्यावसायिक रंगभूमीवर परतले आहेत. ते व्यावसायिक नाटकात काम करताना दिसणार आहेत. सचिन खेडेकर यांनी आजवर दमदार अभिनयकौशल्याच्या जोरावर मराठीत चित्रपट, मालिका, नाटक या तीनही माध्यमांत आपला ठसा उमटवला आहे. तसंच हिंदी, तेलुगू, गुजराती, तमिळ, मल्याळम चित्रपट तसेच वेब सीरिजमध्येही त्यांच्या अनेक भूमिका केल्या आहेत. आता एका वेगळ्या भूमिकेत ते प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहेत. 'गेट वेल सुन', 'हॅम्लेट', 'हसवा फसवी', 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी', 'युगांत', 'संज्या छाया', 'हरवलेल्या पत्त्यांचा बंगला', 'चारचौघी', 'आज्जी बाई जोरात' अशा अनेक दर्जेदार नाटकांद्वारे मराठी रंगभूमी गाजवणार्या जिगिषा आणि अष्टविनायक या निर्मिती संस्था आता पुन्हा एकदा नवीन नाटकासह प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. आयुष्यात प्रत्येकाच्या वाट्याला एक 'भूमिका' येते. ती जगण्यासाठी तुम्ही प्रत्येक वेळी कलावंत असण्याची गरज नसते. असे म्हणत जिगिषा आणि अष्टविनायक आपल्या आगामी नाटकाची घोषणा करत आहेत. 'भूमिका' असे या नाटकाचे नाव असून यात सचिन खेडेकर मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. या नाटकाचे दिग्दर्शन चंद्रकांत कुलकर्णी करणार आहेत. दरम्यान, सचिन 'जुनं फर्निचर' आणि 'ए वतन मेरे वतन' या सिनेमातून अखेरचे प्रेक्षकांच्या भेटीस आले. त्यानंतर आता त्यांच्या या आगामी प्रोजेक्टविषयी त्यांचे चाहतेही खूप उत्सुक आहेत. 'भूमिका' या नाटकात ते नेमकी कोणती व्यक्तिरेखा साकारणार आहेत याबद्दल उत्सुकता आहे. याच महिन्यात हे नाटक रंगभूमीवर येणार असल्याचे घोषित करण्यात आले आहे.

## ‘पी.एस.आय. अर्जुन’मध्ये अंकुश चौधरी



मराठी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी छाप उमटवणारा, सुपरस्टार अंकुश चौधरी लवकरच एका नव्या दमदार भूमिकेत झळकणार आहे. 'पी.एस.आय. अर्जुन' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख सोशल मीडियावर जाहीर करण्यात आली असून ९ मे २०२५ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. थांब म्हटलं की थांबायचं अशी चित्रपटाची टॅगलाईन असल्यामुळे या चित्रपटाबद्दल उत्सुकता पाहायला मिळतेय. मोशन पोस्टरमध्ये अंकुशचा पोलिसांच्या वर्दीतला पीएसआयचा लूक पाहायला मिळत आहे, जो चित्रपटाच्या कथानकाविषयी अधिकच उत्सुकता निर्माण करणारा आहे. चाहत्यांना पहिल्यांदाच अंकुश चौधरी एका दमदार पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. पोस्टरमध्ये अर्जुनचा करारी आणि धाडसी लूक दिसत असून प्रेक्षकांसाठी हा चित्रपट म्हणजे एक पर्वणी ठरणार आहे. अंकुशने आतापर्यंत विविधांगी भूमिका साकारून मनोरंजन केले आहे. यापूर्वी प्रेक्षकांनी अंकुशला रोमँटिक, ॲक्शन हिरोच्या अंदाजात पाहिले आहे. मात्र या चित्रपटात अंकुश वेगळ्याच भूमिकेत दिसणार आहे. सध्या तरी या चित्रपटात कोण कलाकार झळकणार हे समोर आले नसले तरी लवकरच याबद्दलची माहिती प्रेक्षकांसमोर येईल.



# याद न जाये बीते दिनोंकी...
# ज्युबिलीकुमार, राजेंद्रकुमार.!

**भारताच्या फाळणीचे भले- बुरे परिणाम स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय समाज जीवनावर झाले. याबद्दल या सदरात विस्तृत ऊहापोह झालेला आहेच. सध्या पाकिस्तानात असलेल्या पंजाब प्रांतातून व संपूर्णतः पाकिस्तानात समाविष्ट झालेल्या सिंध प्रांतातून भारतात मूलतः आश्रय घेण्यासाठी आलेल्या व्यक्तींनी व कलाकारांनी पुनश्च हरिओम म्हणून जीवनाची नवीन सुरुवात केली. संपूर्णतः व्यावसायिक दृष्टिकोन अंगीकारलेल्या या कलावंतांनी हिंदी चित्रपटसृष्टीचा चेहरा-मोहरा आमूलाग्र बदलवून टाकला, हे मात्र निश्चित.**

२० जुलै १९२७ रोजी सियालकोट, पाकिस्तान येथील सुखवस्तू पंजाबी हिंदू कुटुंबात जन्मलेल्या राजेंद्रकुमार तुली यांच्या सुखासीन आयुष्यात कशाचीही कमतरता नव्हती. परंपरागत सैन्य पुरवठादार व ऊर्जितावस्थेतील कापड व्यवसाय (कराची, सिंध) यातून प्राप्त संपत्तीमुळे कुटुंबाला कशाचीही ददात नव्हती. लहानपणापासूनच व्यवसाय हीच आवड असलेल्या राजेंद्रकुमारांना अवघ्या विसाव्या वर्षी नेसत्या वस्त्रानिशी भारतात यावे लागले. संपूर्ण जमीनजुमला, धन-दौलत व ऐश्वर्य यांना तिलांजली देऊन तुली कुटुंबीय भारतात आले. कोणतेही भाग- भांडवल जवळ नसताना व संपूर्णतः अनोळखी प्रदेशात राजेंद्रकुमार यांनी मुंबईच्या चित्रपट क्षेत्रात १९४९ साली प्रवेश केला. आश्चर्याचा भाग म्हणजे, त्यांना अभिनेता बनण्यात अजिबात रस नव्हता. जुन्या ओळखीतील हरमानसिंग रवैल यांच्यासमवेत सहायक दिग्दर्शक म्हणून त्यांनी कार्यारंभ केला. '

पतंगा' (१९४९) या धमाल चित्रपटात त्यांनी एक छोटीशी भूमिका साकारली. या चित्रपटाने चांगला व्यवसाय केला तसेच राजेंद्रकुमार यांना स्थिरावण्यासही मदत केली. १९५० या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'जोगन' या केदार शर्मा दिग्दर्शित चित्रपटात त्यांनी एक फुटकळ भूमिका केली, पण महत्त्वाचे म्हणजे 'अभिनयसम्राट' दिलीपकुमार यांना निरखण्याची व त्यांच्या शैलीदार अभिनयाचे सुक्ष्म अवलोकन करण्याची सुवर्णसंधी त्यांना प्राप्त झाली. कळतनकळत त्या अभिनय शैलीचे गारुड त्यांच्या मनावर चिरंतन मोहिनी घालून गेले. हाडाच्या व्यावसायिक राजेंद्रकुमार यांना नायकपद व त्यासमवेत येणारा नावलौकिक, धनसमृद्धी खुणावू लागली होती. १९५१ ते १९५५ या कालावधीत त्यांना एकही चित्रपट मिळाला नाही. पण रवैल साहेबांसोबत त्यांचे साहचर्य टिकून होते. त्यांची कामावरील निष्ठा, वक्तशीरपणा व शिकण्याची वृत्ती याचा परिचय हळूहळू चित्रपटसृष्टीला होऊ लागला होता.

१९५५ साली त्यांना होतकरू दिग्दर्शक देवेंद्र गोयल दिग्दर्शित 'वचन' चित्रपटात नायकाची भूमिका करण्याची संधी प्राप्त झाली. राजेंद्रकुमार हे हळूहळू परिचित होऊ लागले. तूफान और दिया (१९५६), आवाज (१९५९) या पाठोपाठ आलेल्या चित्रपटांनी त्यांना नायक म्हणून स्थैर्य दिले. त्याचवेळी, त्यांच्यावरील दिलीपकुमार यांच्या अभिनयशैलीचा जाणवण्याइतपत प्रभाव सर्वसामान्य रसिकांना जाणवू लागला. राजेंद्रकुमारांच्या अभिनय यात्रेतील एक महत्त्वपूर्ण चित्रपट म्हणजे 'मदर इंडिया' (१९५७). अर्थात, या चित्रपटाच्या उत्तुंग यशाचे बहुतांश श्रेय नर्गिस यांना गेले, ही वस्तुस्थिती. १९५८ साली आलेल्या 'घर संसार' चित्रपटातील ते व कुमकुम यांच्यावर चित्रित 'ये हवा, ये नदी का किनारा' हे गीत गाजले. राजेंद्रकुमार यांच्यामध्ये एक प्रणयी, उत्फुल्ल नायक दडलेला आहे याची ही चाहूल होती. त्याचवर्षी आलेल्या 'तलाक' चित्रपटातील त्यांचा संवेदनशील अभियंता व कवी सिनेरसिकांना पसंत पडला व खऱ्या अर्थाने त्यांचा भाग्योदय झाला.

राजेंद्रकुमार यांना यशाकडे घेऊन जाणारे वर्ष म्हणजे १९५९! याचवर्षी प्रदर्शित झालेल्या 'धूल का फूल' व 'गूंज उठी शहनाई' या चित्रपटांनी अमाप यश मिळवले तसेच महानायक दिलीप, देव, राज व बंडखोर सितारा शम्मी कपूर यांच्या व्यतिरिक्त चित्रपट स्वबळावर पेलून नेणारा नायक म्हणून राजेंद्रकुमार यांचा बोलबाला होऊ लागला. १९६० च्या दशकाच्या सुरुवातीला राजेंद्रकुमार यांनी 'कानून' या गीत-विरहित न्यायालयीन नाट्यात वकिलाची भूमिका जोरकसपणाने निभावली. १९६१ साली आलेल्या यशस्वी 'जिंदगी और ख्वाब', 'आस का पंछी' व 'धर्मपुत्र' राजेंद्रकुमार यशाचे काही सोपान निश्चित चढले. १९६१ साली 'अमर रहे ये प्यार', 'घराना' व 'ससुराल' या चित्रपटांच्या तडाखेबंद यशाने ते आबालवृद्ध व विशेषतः तरुण वर्गाच्या पसंतीचे नायक झाले. १९६३ साली 'दिल एक मंदिर', 'गहरा दाग', 'हमराही' व 'मेरे मेहबूब' या महोत्सवी यशप्राप्त चित्रपटांनी त्यांना आपसूक 'ज्युबिलीकुमार' असे संबोधल्या जाऊ लागले. राज कपूर यांच्या महत्त्वाकांक्षी 'संगम' चित्रपटातील भूमिकेने त्यांच्या यशोदायी नायकपदावर जणूकाही शिक्कामोर्तबच केले. 'ये मेरा प्रेमपत्र पढकर के तुम नाराज ना होना' हे गीत बरीच वर्षे प्रेम-व्याकुळ तरुणाईच्या प्रेमपत्रांचा मायना असे. 'आयी मिलन की बेला' (१९६४), 'जिंदगी' (१९६४), आरजू (१९६५). १९६६ सालच्या पोषाखी 'सूरज' चित्रपटात त्यांच्यावर मोहंमद यांनी गायलेले 'बहारों फूल बरसाओ' हे अप्रतिम गीत चित्रित झाले होते. तर 'तो बुरा मान गये' (आयी मिलन की बेला) या खट्याळ गीताचा जणू पुढचा भाग असलेले 'चेहरे से गिरी जुल्फे कह दो तो हटा दू मैं' त्यांनी पडद्यावर खेळकररीत्या प्रस्तुत केले. 'कैसे समझावू बडी नासमझ हो' व 'इतना है तुमसे प्यार मुझे' या बहारदार युगल गीतांनी चित्रपटाच्या यशास हातभार लावला. नौशाद यांच्या वेगळ्या धाटणीच्या संगीताने सजलेल्या 'साथी' व शंकर जयकिशन यांच्या लोकप्रिय संगीताने सजलेल्या 'झुक गया आसमान' या चित्रपटांच्या खणखणीत यशाने राजेंद्रकुमार परत चर्चेत आले. १९६९ साली 'अंजाना' व 'शतरंज' या चित्रपटांनी माफक यश मिळवले तर 'भारत की एक करोड की फिल्म' अशी जाहिरात केलेला 'तलाश', उत्तम निर्मितिमूल्ये व सुश्राव्य संगीत असूनही कोसळला. अर्थात, यावर्षी राजेश खन्नाचा जो झंझावात प्रारंभ झाला; त्यात राजेंद्रकुमार यांचे सिंहासन भुईसपाट झाले. १९७१ सालचा 'आप आए बहार आयी' हा चित्रपट सुश्राव्य संगीताच्या बळावर चांगला चालला, पण चित्रपटाच्या यशाचे श्रेय लक्ष्मीकांत प्यारेलाल व साधना यांना गेले. पराकोटीचे व्यावसायिक असलेले राजेंद्रकुमार हे एक जिंदादिल, रसिक व दिलदार व्यक्ती होते. राज कपूर व सुनील दत्त यांच्याशी त्यांची प्रगाढ मैत्री होती.

एकेकाळी हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात श्रीमंत व्यक्ती अशी त्यांची ओळख होती. सरस्वती ऑईल मिल्स ही नामवंत कंपनी त्यांच्या व राज कपूर यांच्या संयुक्त मालकीची होती. आपला 'डिंपल' बंगला त्यांनी राजेश खन्नाला विकला व त्यांचा भाग्यऱ्हास सुरू झाला. त्यांचे सुपुत्र कुमार गौरव यांच्यासाठी लव्ह स्टोरी (१९८१), लव्हर्स (१९८३), नाम (१९८६), जुर्रत (१९९१), फूल (१९९९) हे चित्रपट त्यांनी निर्माण केले. संपूर्ण कारकीर्दीत त्यांना कोणताही पुरस्कार मिळाला नाही, पण एका कालखंडात त्यांनी लक्षणीय यश मिळवले, हे मात्र खरे. एखाद्या व्यक्तीचा जमाना असतो..! शेवटी, पुरुषस्य भाग्यम्.. हेच खरे. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

**देवेंद्र प्रभुणे**

# 'छावा'ने मोडला 'बाहुबली २'चा रेकॉर्ड




'छावा' चित्रपट प्रदर्शित होऊन २५ दिवस झाले आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली आहे. चित्रपट अजूनही थिएटर्समध्ये चालतोय. 'छावा' विकी कौशलच्या करिअरमधील सर्वाधिक कमाई करणारा सिनेमा ठरला आहे. इतकंच नाही तर हा यंदाचा सर्वाधिक करणारा भारतीय चित्रपट आहे. या चित्रपटाने एसएस राजामौली यांच्या ब्लॉकबस्टर सिनेमाचा रेकॉर्ड मोडला आहे.

'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शन मराठमोळे लक्ष्मण उतेकर यांनी केले आहे. तब्बल ४ वर्षांच्या मेहनतीनंतर तयार झालेल्या या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची शौर्य गाथा दाखवण्यात आली आहे. त्यांनी लढलेल्या लढाया, त्यांचे बलिदान या सिनेमात पाहायला मिळते. हा चित्रपट १४ फेब्रुवारीला रिलीज झाला आणि त्याने बॉक्स ऑफिस गाजवलं. तब्बल २५ दिवसांनंतरही हा चित्रपट सिनेमागृहात यशस्वीरित्या चालतोय. 'छावा'मध्ये बॉलीवूड अभिनेता विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका केली आहे. तर महाराणी येसूबाईंच्या भूमिकेत रश्मिका मंदाना आहे. औरंगजेबाची भूमिका बॉलीवूड अभिनेता अक्षय खन्नाने साकारली असून कवी कलश या भूमिकेत अभिनेता विनीत कुमार सिंह आहे. या चित्रपटाने सिनेमागृहात उत्तम कामगिरी केली असून 'बाहुबली २' चा रेकॉर्ड मोडला आहे. विकी कौशलच्या 'छावा'ने 'बाहुबली २' च्या हिंदीतील कलेक्शनला मागे टाकले आहे. आता 'छावा' बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक कमाई करणारा सहावा हिंदी चित्रपट ठरला आहे. २५ दिवसांनंतर 'छावा'चे भारतातील कलेक्शन ५१७.१८ कोटी रुपये झाले आहे. यापैकी ८.२५ कोटी रुपये 'छावा'ने तेलुगू भाषेत कमावले आहेत. प्रभासच्या 'बाहुबली २'ने २०१७ मध्ये ५११ कोटी रुपयांची कमाई केली होती. तर, शाहरुख खानच्या जवान चित्रपटाने ५२४.५३ कोटी रुपयांची कमाई केली आणि 'गदर २' ने हिंदीमध्ये ५२५.७ कोटी रुपयांची कमाई केली होती. 'पुष्पा २: द रुल' हा ८३५.३६ कोटी रुपयांसह सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट आहे.



# नागा चैतन्य आणि साई पल्लवीचा 'थंडेल' ओटीटीवर

अभिनेता नागा चैतन्य आणि अभिनेत्री साई पल्लवी यांचा 'थंडेल' हा सिनेमा सध्या चर्चेत आहे. या सिनेमाला प्रेक्षकांनी तुफान पसंती दिली आहे. हा थ्रिलर-ड्रामा गेल्या २१ दिवसांपासून बॉक्स ऑफिसवर राज्य करतोय. ७ फेब्रुवारी रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला 'थंडेल'ओटीटीवर कधी प्रदर्शित होणार याबाबत प्रेक्षकांना उत्सुकता होती. आता प्रेक्षकांसाठी आनंदाची बातमी आहे. 'थंडेल' हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित आहे. सिनेमात साई पल्लवी आणि नागा चैतन्य यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर आला आहे. तमिळ असो किंवा हिंदी कोणताही चित्रपट थिएटरमधून काढून टाकल्यानंतरच तो ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित केला जातो. काही चित्रपट एका महिन्याच्या आत तर काही दोन ते तीन महिन्यांनी ओटीटीवर प्रदर्शित होतात. 'थंडेल' च्या बाबतीतही असंच काहीसं घडलं आहे. एक महिना आणि ७ दिवसांनी हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. रिपोर्टनुसार, 'थंडेल' १४ मार्चपासून ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रसारित झाला आहे. सॅकॅनिल्कनुसार, 'थंडेल'ने जगभरात १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली आहे. 'थंडेल'बद्दल बोलायचं झालं तर, या सिनेमाची कथा काही मच्छिमारांभोवती फिरते. काही मच्छीमार मासेमारीसाठी गुजरातला जातात आणि चुकून पाकिस्तानात पोहोचतात. या चित्रपटात पाकिस्तानी तुरुंगात मच्छिमारांवर कसा अत्याचार केला जातो आणि त्यांना देशात परत कसं आणलं जातं, हे पाहायला मिळतंय.



# अल्लू अर्जुनसोबत शिवकार्तिकेयन करणार स्क्रीन शेअर

सध्या अल्लू अर्जुन त्याच्या आगामी नवीन चित्रपटामुळे चर्चेत आहे. तो दिग्दर्शक ॲटलीसोबत काम करणार आहे. परंतु या प्रकल्पाची अधिकृत घोषणा अजूनही झालेली नाही. आधी असे म्हटले जात होते की हा एक मल्टीस्टारर चित्रपट असेल, पण आता या बातम्यांबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. ॲटलीच्या चित्रपटाबद्दल असे म्हटले जात होते की, त्यात शिवकार्तिकेयन देखील असतील, परंतु आता हे दावे चुकीचे सिद्ध झाले आहेत. अल्लू अर्जुनच्या टीमने स्पष्ट केले की हा मल्टीस्टारर चित्रपट नसेल. अल्लू अर्जुन व्यतिरिक्त यात दुसरा कोणताही स्टार नसेल. त्यात इतर कोणाचीही दीर्घ भूमिका असणार नाही किंवा कोणताही कॅमिओही असणार नाही. अल्लू अर्जुन लवकरच ॲटलीच्या चित्रपटावर काम सुरू करू शकतो. ॲटलीने यापूर्वी 'जवान' सारखा हिट चित्रपट बनवला होता. याशिवाय, अल्लू अर्जुन चौथ्या चित्रपटात दिग्दर्शक त्रिविक्रम श्रीनिवाससोबतही काम करू शकतो. दोघांनीही याआधी अनेक हिट चित्रपट एकत्र दिले आहेत. ॲटलीचा हा चित्रपट पौराणिक कथेवर आधारित असू शकतो. यामध्ये अल्लू अर्जुन भगवान कार्तिकेयची भूमिका साकारू शकतो. ही भूमिका त्याच्यासाठी एक नवीन अनुभव असेल. या बातमीने चाहते खूप उत्सुक आहेत. अल्लू अर्जुन अलीकडेच 'पुष्पा २: द रुल' मध्ये दिसला. हा चित्रपट सुकुमार यांनी दिग्दर्शित केला होता. यामध्ये अल्लूने तस्करी सिंडिकेटचा नेता पुष्पराजची भूमिका साकारली होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बरीच कमाई केली होती. 'पुष्पा २' मध्ये रश्मिका मंदान्ना, फहाद फासिल, जगपती बाबू आणि सुनील सारखे कलाकार देखील होते. हा चित्रपट ५ डिसेंबर २०२४ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. नंतर ते नेटफ्लिक्सवरही आले आणि मोठ्या प्रमाणात ऑनलाइन स्ट्रीम केले गेले.

# आणखी एक कपूर बॉलिवूड पदार्पणासाठी सज्ज

सध्या एकामागोमाग एक स्टारकिड्सचे बॉलिवूडमध्ये पदार्पण होत आहे. नुकताच इब्राहिम अली खानचा डेब्यू चित्रपट 'नादानियां' प्रेक्षकांच्या भेटीला आला. आता इब्राहिम पाठोपाठ आणखी एक स्टारकिड नवीन चित्रपटासह मोठ्या पडद्यावर पदार्पण करण्यासाठी तयार आहे. शनाया कपूर लवकरच 'तू या मैं' या चित्रपटात झळकणार आहे. त्यामुळे आता सुहाना, खुशी कपूर पाठोपाठ शनायाचे देखील बॉलिवूडमध्ये पदार्पण होणार आहे. शनाया ही अभिनेते अनिल कपूरची पुतणी आहे, तर संजय कपूरची मुलगी आहे. शनायाच्या आगामी 'तू या मैं' या चित्रपटाचा टीझरही रिलीज झाला आहे. हा चित्रपट एक सर्व्हायव्हल थ्रिलर आहे. या चित्रपटात शनाया कपूरसोबत अभिनेता आदर्श गौरव मुख्य भूमिकेत दिसेल. सोशल मीडियावर या चित्रपटाच्या टीझरला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. या टीझरवर शनायाच्या मैत्रिणी सुहाना खान, अनन्या पांडे आणि नव्या नंदा यांनीही प्रतिक्रिया दिल्या आहेत. 'शैतान' फेम दिग्दर्शक बिजॉय नांबियार यांनी 'तू या मैं' चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. टीझरसोबतच चित्रपटाची रिलीज तारीख देखील समोर आली आहे. हा चित्रपट वर्ष २०२६ मध्ये व्हॅलेंटाइन डे ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'तू या मैं' सोबतच शनाया आणखी एका चित्रपटात मुख्य भूमिका साकारत आहे. शनाया अभिनेता विक्रांत मेस्सीसोबत 'गुस्ताखियां' चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटाचे शूटिंग देखील पूर्ण झाले आहे.

